ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 8 | APRIL - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# बंजारा समाज - स्त्री जीवनाचा ऐतिहासिक अभ्यास



**Dr. Sajjan Udhhav Pawar**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग, शंकरराव मोहिते महाविद्यालय
अकलूज,जि.सोलापूर
**Pandurang Valchand Jadhav**
संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग शंकरराव मोहिते महाविद्यालय
अकलूज,जि.सोलापूर

## प्रस्तावना

बंजारा समाज हा भारतातील एक प्राचीन व समृद्ध संस्कृती असलेला समाज आहे. या समाजाच्या जडणघडणीत बंजारा स्त्रीचे स्थान खूप महत्त्वाचे आहे. कष्ट, सहनशीलता, परंपरेचा अभिमान आणि बदल स्विकारण्याची ताकद या गुणांमुळे बंजारा स्त्री ओळखली जाते. शेतीमजुरी, पशुपालन, हातकाम, पारंपरिक व्यवसाय यांमध्ये तिचा सक्रिय सहभाग असतो. त्यामुळे कुटुंबाच्या अर्थकारणात तिचा मोलाचा वाटा असतो.

बंजारा संस्कृतीच्या जतनात बंजारा स्त्रीची भूमिका फार महत्त्वाची आहे. तिची रंगीबेरंगी वेशभूषा, पारंपरिक दागिने, लोकगीते व नृत्ये ही बंजारा संस्कृतीची ओळख आहेत. समाजाच्या प्रगतीसाठी तिचे योगदान अमूल्य आहे. सोलापूर जिल्ह्यातील बंजारा स्त्रियांचे जीवन कसे आहे याचा आढावा आपण या शोधनिबंधातून घेणार आहोत.

## पारंपारिक वेशभुषा

बंजारा जमातीच्या बोलीभाषा आणि वेशभूषा यामागे प्राचीन इतिहास दडलेला आहे. बंजारा संस्कृतीमध्ये वेशभूषेला खूप महत्त्व आहे. बंजारा समाजातील स्त्रीयांची वेषभुशा ही आगळ्यावेगळ्या पध्दतीची असून वैशिष्टपूर्ण आहे. लाल किंवा निळा भडक रंगाचा घागरा वापरतात, त्याला बंजारा भाषेत फेटीया असे म्हणतात, डोक्यावरून पायापर्यंत मोठी लाल रंगाची ओढणी असते, त्याला बंजारा लोक पामडी असे म्हणतात. या पामडीला पायाजवळील भागास निळ्या किंवा लाल रंगाची गोट लावली जाते. आणि डोक्यावर ठेवण्याच्या ठिकाणी लहान गोल आरसे आणि काही रूपयांचे नाणे व त्याच्या बाजूस लोकरीचे गोंडे लावून काचगुंडीची मध्यम, रुंद अशी पट्टी तयार करून लावली जाते. त्याला बंजारा रपिया, काचे, उन्नीरो फुंदा लावलेले घुंघटो असे म्हणतात. काशिदा काढलेली म्हणजेच हाताने विणकाम केलेली आणि त्यावर कवड्या (कोडी) भिंगे, (लहान काच) इत्यादींनी बनविण्यात आलेली भडक लाल रंगाची चोळी बंजारा स्त्रिया वापरतात, त्याला बंजारा 'काचळी' असे म्हणतात. काचळी ही समोरिल भागाला असते आणि पाठिमागील काही बाजू उघडी असते, परंतु ओढणी म्हणजेच पामडी यांनी ती पूर्णपणे झाकलेली असते. याचबरोबर बंजारा स्त्रीया हाताच्या कोपऱ्यापर्यंत हस्तीदंताच्या अथवा पिंगाच्या किंवा पितळाच्या बांगड्या घालतात, त्याला बंजारा भाषेमध्ये बलिया असे म्हणतात, तर दंडामध्ये वाकी (कोपऱ्या) वापरतात. तसेच गळयात नाणे व लहान-लहान काचेचे गोल भिंग आणि त्यावर उन्नलचे गोंडे लावलेली हार (माळ) वापरतात. नाकात मोठी गोलाकार नथणी वापरतात, त्याला भुरिया असे म्हणतात, पायात चांदीची वाळे (पोगर) आणि पैंजन वापरतात, तर पायाच्या बोटामध्ये जोडवा (चटकी) घालतात. बंजारा समाजात अलिकडील काळामधील स्त्रियांनी मनगटात काचेच्या बांगड्या भरण्याची प्रथा सुरू झालेली आहे

## केशभूषा

बंजारा स्त्रीची केशरचना ही इतर स्त्रियांच्या केशरचनेपेक्षा खूप भिन्न असते. बंजारा स्त्रिया आपल्या केसाचे दोन भाग करून दोन्ही गालावर केस घेतात व विशिष्ट पद्धतीने गुंतवून केस बांधतात त्यास चोटला बांधळो असे म्हणतात. पाठीमागे जे केस बांधले जातात त्यास मुळे किंवा अटी म्हणतात. बंजारा स्त्रियांच्या केस रचनेमध्ये सौभाग्याचा प्रतीक म्हणून घुगरी हा दागिना समोरच्या भागात लावलेला असतो. बंजारा स्त्री केशरचना करताना ती डोक्याच्या मधोमध भांग पाडते आणि दोन्ही बाजूचे केस कानाकडे ओढून घेते समोरील केस गालावर

आणते व गुतणी करते. बंजारा स्त्रियांची केस रचना ही तीला स्वतःला पूर्ण करता येत नाही. ही केशभूषा करण्याकरिता मदतीला एक स्त्री आवश्यक असते.

## बंजारा स्त्री आभुषणे

बंजारा स्त्रियांचे दागिने हे नक्षीकाम केलेले असतात. घुगरी, वाकडी, मुढिया, कानात कन्या, बिंदीवानी, तरोटी, टोपली, हसली, घुघरी, गोपहार, साकळी, मुंगार हार,रपीया हार, चुडी, बेगड, कसोट्या, मुटिया, विटी, माचळी, चटकी या प्रकारचे विविध दागिने बंजारा स्त्रिया वापरतात.

**१. बलिया**

बंजारा स्त्रिया दंडापासून मनगटापर्यंत पांढऱ्या रंगाच्या हस्तिदंताच्या ज्या बांगड्या घालतात त्यास बलिया म्हणतात.

**२. बाजुबंद**

बाजुबंद हा चांदीचा दागिना असून दोन-तीन बोटे रुंद अशा चांदीच्या प्लेन पट्टीवर थोड्या अंतरावर वाजणारा घुंगराचा गुच्छ गुंफलेला असतो, हा दागिना बलियाच्यावर दंडात घालतात.

**३. कंगणी**

बलियाच्या वरच्या बाजुला कंगणी घालतात. कंगणी हा चांदीचा असून गोलाकार पट्टीवर अगदी जवळ-जवळ घुंगरू फिट केलेले असतात. हा अलंकार स्त्रिया आपल्या ऐपतीप्रमाणे चांदी, रुपे, पितळ या धातूचे बनवून घेतात. कंगणी तांड्यातील uनायकणण कारभारण हमखास वापरतात.

**४. कनिया**

बंजारा स्त्रियांच्या कानातील आभूषणास कनिया असे म्हणतात. कनिया हि चांदीपासून बनविली जाते. कानातील या आभूषणास बाली असेही म्हणतात.अशा प्रकारचे अनेक दागिने बंजारा स्त्रीया वापरतात.

## हस्तकला

अनेक तांड्यात वृद्ध् महिला या हस्तकला जाणतात. भरतकाम व कशिदायुक्त आपली संस्कृती पुढच्या पिढ्यांना हस्तांतरित करीत आहेत. परंतु याचे प्रमाण आज नाश होण्याच्या मार्गावर आहे. आजच्या मुलींना ही पारंपारिक हस्तकला अवगत झालेली नाही. पूर्वीच्या स्त्रिया बकिया, कशिदो, वळके टोटो, फुंदाकाम, काचकाम, कोथळी, सोड अशा कला बंजारा स्त्रियांना येत होत्या; परंतु सध्या या कला लोप पावत असलेल्या दिसुन येत आहेत.

## सामाजिक व अर्थिक जीवन :-

बंजारा स्त्रिया कुटुंबाच्या उपजिविकेच्या महत्वाच्या घटक आहेत. कौटुंबिक घरखर्च, व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्या हातभार लावतात. बंजारा स्त्रियांचे उत्पन्नाचे प्रमुख साधने म्हणजे शेती व शेतीपूरक कामे करणे, शेतमजुरी, शेळी, गाय, मेंढी अशा प्राण्यांचे पालन करणे, मोलमजुरी, ऊसतोड करणे, इ. होय. तसेच भरतकाम, शिवणकाम व पारंपारिक हस्तकला, रंगबेरंगी कपडे शिवणे, अलंकार तयार करणे व त्या वस्तूंची विक्री करुन अर्थिक अर्जन करून कुटुंबास मदत करणे अशी कामे बंजारा स्त्रिया करतात. सध्याच्या काळात बंजारा स्त्रिया स्वयंरोजगार, बचत गट, लघुउद्योग. महिला मंडळे यांच्यात भाग घेऊन कुटुंबास होता होईल तेवढी अर्थिक मदत करतात. सरकारी योजनांचा लाभ घेऊन आपले व आपल्या कुटुंबाचे अर्थिक जीवन सुधारण्याकडे त्यांचा कल आहे. अशाप्रकारे बंजारा स्त्रिया मेहनत करुन, चिकाटीने कुटुंबाची अर्थिक जबाबदारी पेलताना आपणास दिसतात.

## सांस्कृतिक जीवन :-

बंजारा समाजातील लोकांचे जन्म झालेपासून ते मृत्यूपर्यंतचे विधी, सण-उत्सव समारंभ हे गीत व नृत्याशिवाय अपूर्णच. बंजारा स्त्रियांची लोकगीते पिढ्यान पिढ्या चालत आलेली आहे. या गीतांमध्ये प्रेम, निसर्ग, देव-धर्म, दैनंदिन जीवन, आनंद व विरह यांचे भाव व्यक्त होतात. बंजारा स्त्रियांचे लांबांडी हे प्रसिद्ध पारंपारिक नृत्य असुन स्त्रिया रंगबेरंगी वेशभूषेत गटाने, लयबद्ध हालचाली व ठेक्यांसह नृत्य सादर करतात. तीज, दिवाळी, होळी यांसारखे सण मोठ्या आनंदाने साजरे करतात. बंजारा स्त्रिया निसर्गपुजक असुन त्या कुलदेवतांची पुजा सुध्दा श्रध्देने करतात. यामंधून बंजारा स्त्रिया आपली संस्कृती व परंपरा जपतात.

## आधुनिक बंजारा स्त्रीया :-

आधुनिक काळात शिक्षण, स्वयं-सहायता गट, शासकीय योजना आणि सामाजिक जागृतीमुळे बंजारा स्त्रीमध्ये सकारात्मक बदल घडताना दिसतो आहे. आज अनेक बंजारा स्त्रिया शिक्षण घेत आहेत, नोकरी-व्यवसाय करत आहेत आणि समाजाच्या नेतृत्वातही पुढे येत आहेत.

**समारोप**

बंजारा समाजात स्त्रीयांचे महत्वपूर्ण स्थान आहे. बंजारा संस्कृतीच्या जतनात बंजारा स्त्रीची भूमिका फार महत्त्वाची आहे. बंजारा स्त्रिचे जीवन कष्टमय आहे. पांरपारिक घागरा-चोळी (लहंगा-काचळी), रंगीबेरंगी ओढणी आणि चांदीचे दागिणे हि त्यांची खास ओळख आहे. बंजारा समाजातील स्त्रियांची विशिष्ट रंगबेरंगी वेशभूषा, केशभूषा, पारंपरिक दागिने, लोकगीते व नृत्ये ही बंजारा संस्कृतीची ओळख आहेत.

बंजारा स्त्रिया सण उत्सव, जत्रा, गौरसंस्कार आणि विवाह समारंभात उत्साहाने सहभागी होतात. ढोल व ढोलकीच्या तालावर पारंपारिक लोकनृत्य करतात आणि गोरमाटी या बोलीभाषेत लोकगीते गातात. तीज, दिवाळी, होळी यांसारखे सण मोठ्या आनंदाने साजरे करतात. बंजारा स्त्रिया निसर्गपुजक असुन त्या कुलदेवतांची पुजाअर्चा सुध्दा श्रध्देने करतात. परंतु आधुनिक काळात बंजारा स्त्रियांनी आधुनिक जीवनशैली स्विकारलेली दिसुन येते. तांड्यावरील काही वृद्ध बंजारा स्त्रीया या पारंपारिक पेहराव, केशरचना, दागिने यांचा वापर करताना दिसतात परंतु तरुण स्त्रिया याचा वापर करत नसल्याचे आपणास दिसुन येते.त्यामुळे बंजारा समाजातील संस्कृती लोप होण्याच्या मार्गावर आहे. काळानुसार परंपरा जपत नोकरी, व्यवसाय, स्वयंरोजगार, बचत गट, लघुउद्योग यात सहभाग वाढवून अर्थिक स्वावलंबनकडे वाटचाल करत आहेत.

अशा प्रकारे, बंजारा समाजातील स्त्री ही कष्टाळू, स्वाभिमानी, परंपरा जपणारी तसेच आपल्या परंपरा जपत आधुनिकतेकडे वाटचाल करत बदलाची वाट चोखळणारी अदभूत शक्ती आहे. समाजाच्या प्रगतीसाठी तिचे योगदान अमूल्य आहे.

**संदर्भ साहित्य**

१) डॉ.गणपत राठोड बंजारा लोकगीतो मे नारियों का योगदान, नेहा प्रकाशन, अंबाजोगाई,२०११ पृ.क्रं.४६
२) राठोड आत्माराम कनिराम,गोरबंजारा इतिहास व लोकजीवन, पृ.क्रं.१४०,१४१
३) पवार श्रीराम, पारंपारिक गोरबंजारा स्त्री काशिदाकारी, भरतकाम व हस्तकला पृ.९
४) उपरोक्त,पवार श्रीराम, पारंपारिक गोरबंजारा स्त्री अदाकारी, भरतकाम व हस्तकला पृ.११
५) उपरोक्त,राठोड आत्माराम कनिराम,गोरबंजारा इतिहास व लोकजीवन, पृ.क्रं.१५७
६) उपरोक्त,डॉ.गणपत राठोड बंजारा लोकगीतो में नारियों का योगदान, नेहा प्रकाशन पृ.क्रं.५५
७) उपरोक्त, राठोड आत्माराम कनिराम,गोरबंजारा इतिहास पृ.क्रं.२५८